# प्रभुतरुण

वर्ष ४७ | अंक ३ | मुंबई | सप्टेंबर २०१३ | पाने ६ | किंमत रु. १

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

संपादिका: सुहासिनी कीर्तिकर    कार्यकारी संपादक मंडळ : मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर

*संपादकीय*

## वाढता वाढता वाढे...

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**श्री. सुहास कोठारे**

'प्रभुतरुण' नव्वद वर्षांचा झाला! एखाद्या मान्यवर संस्थेच्या आयुष्यात नव्वद म्हणजे खास नव्हे. शतकाकडे वाटचाल एवढंच. जायते, वर्धते या अवस्था माणसाप्रमाणे तिला असतात. मात्र माणसाच्या आयुष्यात अटळ असणारी शेवटची अवस्था मात्र नसते. वटवृक्ष वाढत चालला की त्याच्या फांद्या, पारंब्यातून एकेक नवीन झाड उगवत, रूजत मूळ वृक्षच अधिक डेरेदार, भारदस्त, पुराणपुरुष होतो. तसंच; अगदी तस्संच प्रभुतरुणाचंही आहे. आजची तरुणाई ही या वृक्षाला अधिक डेरेदार करते आहे. जुनी पिढी प्रेमाचे खतपाणी घालून हा वृक्ष अधिक भक्कम कसा होईल; यासाठी सजग आहे. दरवर्षी नारळीपौर्णिमेला येणाऱ्या वर्धापनदिनाला याचा गोड प्रत्यय येतो अन् अंतस्थ सळसळ वाढते.

१८ ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या प्रभुतरुणाच्या वाढदिवसाला हाच प्रत्यय आला. खार येथील ज्ञाती सभागृहात प्रत्यक्षात सनईवादन नसूनही सकाळ गुंजत आली. प्रभुतरुण प्रेमीजनांची मांदियाळी जमली. शुभेच्छा मन:पूर्वक दिल्या गेल्या. देणग्यांचा वर्षाव झाला. सौ. वृंदा आणि श्री. शाम जयकर येऊ न शकले तरी दरवर्षी त्यांच्याकडून येणारा केक आला. सौ. अनुराधा आणि डॉ. विनोद धुरंधरांकडून दरवर्षी बुंदीचे लाडू असतात. यावर्षी जयकरांच्या केकशेजारी डॉ. धुरंधरांचा मोठा निवशी केक वाढदिवस साजरा करीत होता. अभूतपूर्व कार्य करणारे प्रभुतरुणाचे भूतपूर्व संपादक कै. सुहास कोठारे अन् कै. विहंग नायक यांच्या प्रतिमांना श्री. विनोद प्रधानांनी कृतज्ञतेने पुष्पहार घातल्यावरच वाढदिवसाचा आनंद नंतर दरवळत गेला.

यावर्षी वर्धापनदिनाचा बहुतांश कार्यक्रम डॉक्टरांच्या सहवासात अधिक निरोगी झाला. डॉ. सौ. निवेदिता सत्तूर (पूर्वाश्रमीच्या धैर्यवान) आणि त्यांचे पती डॉ. संदीप सत्तूर हे प्रमुख पाहुणे होते. त्यांचा परिचय कार्यकारी संपादिका सौ. संजना कोठारेने करून दिला. हे दोघेही कुंतलसंवर्धनात आपले कौशल्य पणाला लावतात. (ते हेअर रेस्टॉरेशन शल्यज्ञ आहेत.) डॉ. संदीप सत्तूर यांनी भाषण न करता उपस्थितांनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे हा प्रश्नोत्तराचा कार्यक्रम निरोगी केशसंभार वाढत जावा तसा वाढत गेला. डॉ. संदीप यांनी प्रभुतरुणाला अंती शुभेच्छा दिल्या अन् डॉ. निवेदिता यांनी त्याला 'मम' म्हटले.

कार्यक्रम डॉक्टरांच्या सहवासात निरोगी झाला असे मी वर म्हटलं ते उगीच नव्हे. डॉ. अजित गोरक्षकर हे पाठारे प्रभुंच्या अनुवंशिकतेवर संशोधन करीत आहेत. परभांचे रक्त तपासून वांशिक चिकित्सा त्यांची सध्या चालू आहे. त्यांनी ही कल्पना कशी सुचली, ते हे काम का करीत आहेत; याविषयी थोडक्यात निवेदन केले. प्रभुतरुणाच्या वर्धापनदिनी मग अनेकांनी त्यांना आपल्या रक्ताचे नमुने दिले अन् आपले ज्ञातीय नमुनेदार रक्त अशा कामाकरिता कसे सळसळते ते दाखवून दिले.

ज्ञातीय रक्तात उचित सन्माननीयांचा सन्मान करण्याची वृत्ती

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## My BFF???

-Vaijayanti Kirtikar

On my way in to a local supermarket, I was stopped by the security guy. "Madam, bag ko baggage counter pe rakho." I looked around, he was actually addressing me, then I looked down at myself, yet I couldn't locate the bag he was referring to. "Kaunsi bag bhaiya?" He pointed out at my handbag hanging on my shoulder and again repeated his request. I was surprised. "Bhaiya, aren't purses allowed inside? Since when did you start this new practice?" The security guard nonchalantly "Bags were never allowed inside." Now this is the same supermarket I visit weekly and this is the same security guy I wish a good day every time. As panic set in quickly, thoughts raced through my mind, "I don't want to part with my handbag. It is precious. Has this man gone senile?" As my eyes frantically looked around for help, I noticed through the glass a woman inside the store carrying her handbag. Triumphantly I announced "Bhaiya, that lady is also carrying her purse, so definitely purses are allowed inside." Exasperatedly he said "Madam uska purse hai, chotawala, aapka toh bag hai, badawala, chota purse hai toh aap bhi le jaaiye". Finally it dawned on me that it was my huge Hand bag's fault, size does matter!! The guy probably thought that I was tagging along luggage in my huge bag, he did not realize that it was only my handbag and everything inside it was very valuable.

Well to decode what really goes inside a woman's purse, I decided to rummage inside my own bag. (Sometimes even I wonder why it is getting heavier by the day!) I was certainly expecting some charming things to pop out. Now what I found is charming or not is for you to decide.

Tweezers? Makes sense to always keep tweezers handy, you never know when a splinter lodges itself inside you. Oh well, that explains the cotton ball and bandage too.

6 Tubes of Lip Balms! Well, sometimes it is quite frustrating to locate the Lip Balm inside my bag, so I simply buy a new one. And then who knows, with the current economic scenario, I'll be glad that I have a year's supply of Lip Balms.

Transparent plastic bag with something sticky and orange inside. Smells nice though. Oh these were the orange candies given by a colleague to me. Do you eat orange candies? It looked rude to throw them away, so I simply stashed them inside my bag, could come handy during a rainy day, though they already look like they have been sitting in the rain for long.

Squished Chiki, well nothing wrong with this, again will help you when you are stuck in traffic jam.

Scraps from newspapers, all coupons offering some discount on pizzas and brownies, and they were certainly legible when I stuffed them inside the purse.

Feviquick! 2 tubes!! Well seems like I broke my sandals more than once and had to resort to feviquick.

One single blue earring and one single green earring, must have lost their better halves somewhere and I am still hoping they will return back to me someday.

Various visiting cards, who are all these people, I don't know!

3 watches, it must have rained and I must have thrown the watches inside my bag for safety. Wow I amaze myself; it is so thoughtful of me to care for my watches.

Used tissues, so atleast I don't litter.

Let's keep the not so charming things out of this conversation. But disturbingly what is missing in my bag is pepper sprays, pointed nails and

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

मुळातच आहे. डॉ. गजानन वामनराव विजयकर यांनी वयाची नव्वदी पूर्ण केली म्हणून प्रभुतरुणातर्फे त्यांचा शाल देऊन गौरव करण्यात आला. गेल्या अंकात त्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी मी भरभरून लिहिले होतेच. ते सभागृहात येताच सर्वांनी उत्स्फूर्तपणे उभे राहून त्यांना आदराची सलामी दिली. त्यांचे सुपुत्र डॉ. प्रदीप त्यांना खास घेऊन आले; याबद्दल या लेखात त्यांनाही कृतज्ञ सलाम.

अशी कृतज्ञता दाखविणे हा प्रभुतरुणाचा धर्मच आहे. जितकं करता येईल तितकं सामाजिक जागरण आपल्या कृतीतून प्रभुतरुण करीतच असतो. मागे एकदा वर्धापनदिनाला नेत्रदानाविषयी जागरण त्यानं केलं होतं. यावर्षी त्या ब्रीदाला जागून आदिवासी आश्रमशाळा, म्हसवण येथील पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना प्रभुतरुणानं पाच हजार एक रुपयांची पुस्तकरुपाने देणगी दिली. या शाळेच्या कार्यात आमच्या कोषाध्यक्षा डॉ. सुरेखा धुरंधर गुंतलेल्या आहेत. त्यात प्रभुतरुणाची ही सक्रिय गुंतवणूक झाल्यानं प्रभुतरुण खऱ्या अर्थानं वाढला!

असं वाढणं हे निरोगी लक्षण असतं. त्यासाठी शरीराबरोबरीने मन निरोगी असावं लागतं. 'मनस् षष्ठानि इंद्रियाणि।' म्हणजे मन हे सहावं इंद्रिय आहे असं म्हणतात. त्याचं वर्तन कुणीही वर्तवू शकत नाही, असंही म्हणतात.(You can not predict mind.) पण ते आपल्या शरीरात असतं. शरीर मनाची अंतर्लय, समधातता साधणं फार महत्त्वाचं. यासाठी ब्रह्मविद्या तत्त्वज्ञानानं शरीर मनाची काही तालीम निश्चित केली आहे. त्याविषयी अतिशय प्रभावीपणे श्री. प्रवीण मानकर बोलले. नुसते बोलले नाहीत; तर त्यांनी काही प्रात्यक्षिकं करून दाखवली. श्रोत्यांशी संवाद साधला. त्यांनाही काही शरीरमनाचे प्राणायाम शिकवले. वायूतत्त्वाचं नियंत्रण केलं की कोणते फायदे होतात ते त्यांनी स्वत:च्या उदाहरणांनी दाखवूनच दिलं. कार्यक्रम सुरुवातीपासूनच चढत चढत असा एका अध्यात्मिक विचारांच्या उंचीवर पोहोचला. तोही सहजपणे.

ही सहजता जाणून डॉ. सुमन नवलकरांनी मंचावर एक मिनिट बोलण्याची परवानगी मागितली. चांगल्या कामाला प्रभुतरुण नेहमीच प्रोत्साहन देतो. त्यांच्या मुलानं-सुमीतनं इंग्लिशमधून पुस्तक लिहिलंय. त्याविषयी त्यांनी परिचय करून दिला. श्री. प्रताप वेलकर यांनी या पुस्तकावर फार चांगलं लिहिलं आहे. पुढील अंकी ते छापले जाईलच. तेव्हा पुस्तकाविषयी जास्त लिहिणे इथे टाळते. डॉ. सुमन यांनी ते पुस्तक विक्रीसाठीही उपलब्ध करून दिले.

पुस्तकाचे पान उलटावे अन् रंगत वाढत जावी तसा हा वर्धापनदिनाचा भरगच्च कार्यक्रम अधिकाधिक रंगतच गेला. शिल्पा जयकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तिने मला जेव्हा बोलण्याची संधी दिली तेव्हा मनमोकळेपणाने मी माझे विचार, अनुभव मांडले. एका ज्ञातीय मासिकाची संपादक म्हणून माझ्यावर पडलेली जबाबदारी माझ्या इतर वाङ्मयीन मासिकांच्या संपादनापेक्षा वेगळी आहे. पण ज्ञाती घडामोडींचा अहवाल देतांनाच 'प्रभुतरुणा'ला वाङ्मयीन रूप देण्याचा मी आटोकाट प्रयत्न करते. कारण प्रभुतरुणाची ती परंपरा आहे. दरवर्षी दोन नवीन सदरे दिली जातात. यावर्षी नलिनी तळपदे आणि उज्ज्वल ब्रह्मांडकर ही जबाबदारी पार पाडताहेत. नलिनीबाईंना प्रभुतरुणात लिहिते करण्यात श्री. अजित विजयकरांची सदीच्छा कामी आली. वाङ्मयीन दर्जा राखत असताना कार्यकारी संपादिकांचाही त्यात मोठा वाटा आहे. कार्यालयीन गरजेपोटी जानेवारीपासून विस्तारीत संपादकीय मराठीतच दिले गेले. संजना कोठारे अन् मीनाक्षी जयकर यांनी एकामागोमाग ही अवघड कामगिरी लिखाणाचा दर्जा राखत साधली. मयुरा नायक हिने तिचे इंग्रजीतले विस्तारीत संपादकीय तीन महिने आधीच तयार ठेवले होते. खांद्याला खांदा भिडवून या कार्यकारी संपादिका प्रभुतरुणाची पालखी पुढे चालवीत आहेत; याचा मी शिल्पा जयकरने संधी देताच संधी साधून जाहीर उल्लेख केला. सध्या टी.व्ही.वर एक जाहिरात येतेय्. आपला मुलगा धावपटू बनावा म्हणून आई प्रयत्नांची शर्थ करताना म्हणते की, 'तो मला हरवेल तेव्हाच मी खरी जिंकेन.' तो दाखला देत मी म्हटलं की, ती आई 'जिंकेन' असे भविष्यकालीन बोलते. माझ्या बाबतीत हा भूतकाळ आहे. कार्यकारी संपादिका असलेल्या या माझ्या मुलींनी मला खरोखरच हरवले आहे. मी जिंकले आहे! असं जिंकण्याकरिता समूहसहकार्य लागतंच. शासकीय गरजा पूर्ण करण्यासाठी मला कोर्टात जावं लागलं, दिल्लीस्थित कार्यालयातून प्रकाशन संमती देणाऱ्या कार्यासाठी बेलापूरला जावं लागलं. छापखान्याजवळच्या पोस्टात, कांदिवलीच्या पोस्टातही खेपा घालाव्या लागल्या. यात माझ्यासोबत सदैव होते श्री. प्रदीप कोठारे. हे प्रभुतरुणाचं संचित. मी ते माझ्या भाषणात जाहीरपणे मांडलं तेव्हा श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणं टाळ्यांचा कडकडाट केला. मी खरी जिंकले! हेही प्रभुतरुणाचं संचितच.

हे संचित वाढतंच आहे. म्हणून तर सोशल समाजाध्यक्षा प्रमिला तळपदेंनी शुभेच्छापत्र पाठविलं. प्रभाताच्या कार्यकारी संपादक डॉ. सुनील राणे यांनी शुभसंदेश पाठवला. या शुभेच्छांचं बळ घेऊन अतिथींच्या हस्ते केक कापण्यात आले. तो डॉ. विजयकरांना भरवून तोंड गोड करण्यात आलं. श्री. प्रताप वेलकरांचेही केकने तोंड गोड केले. त्यांचा प्रभुतरुणाला नेहमीच पाठिंबा असतो.

देणगीरूपाने अनेकांनी पाठिंबा दिला. त्या देणग्यांचे वाचन कार्यकारी संपादिका मीनाक्षी जयकरने केले. त्यावेळी ती शेवटी म्हणाली, 'आपली उपस्थिती हीच मोठी देणगी आहे.' किती खरं आहे हे!

म्हणूनच कृतज्ञता मनोमनी भरून येते. प्रभुतरुणाचे विश्वस्त असलेल्या श्री. गुंजारव नायकने ती आभारप्रदर्शन करताना जाहीर रीतीने व्यक्त केली.

वर्धापनदिनाची सांगता 'रविवार सकाळ'च्या निवशी / सिवशी जेवणाने झाली. मनात उतरत गेलेला वर्धापनदिन जीभेने अधिक आस्वाद्य केला.

या पूर्ण समारंभाची छायाचित्रे उत्स्फूर्तपणे उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांनी कॅमेराबद्ध केली. 'छायांनी रेखियले चित्र तेच देखणे'! देखण्या वर्धापनदिनाच्या आठवणी आता मनामनात छायांकित झालेल्या आहेतच. मित्रहो, तुमच्या छायेखाली प्रभुतरुण असाच उत्तरोत्तर वाढावा. तो वाढेलच. कारण तुमचे सर्वांचे क्रियाशील हात आमच्या हाती आहेत. हाथ बढाना! और बढाना!

✳

(पान १ कॉलम ४ वरून)

other useful stuff to ward off attackers. Being a woman in India, I think bags should come along with safety pouches as additional components. Just like mobile companies advertize free phone covers with the mobile handsets, some wise person should start giving out free safety pouches with handbags. I am sure he will be rich in no time. Ofcourse the main attraction in the safety pouch should be a giant size Rakhi (not Sawant, the one you tie on the hand) just in case you need to make someone your brother instantly. There was a time when survival skills included cooking and swimming, today it is wrestling, grappling, kicking and running. But alright, I make up for it with the sheer weight of the bag, who needs the muscley arms and all that training eh? I can just whack someone with my bag!

My loaded handbag seems like I can camp out and seldom go home, and I am prepared for a life full of emergencies, but a woman's mind is as complex as the contents of her handbag; even when you get to the bottom of it, there is ALWAYS something to surprise you!

## प्रकाशातील परभू

## Congratulation



**AMEY VINOD PRABHAKAR**

( Grandson of Smt. Laxmi & Shri Madhav Prabhakar and Mrs. Chanda & Shri Subodh V. Gorakshakar)

Secured a CPT (Credit Performance Index) of 9.65 in MSc (BIOTECHNOLOGY) from Indian Institute of Technology, Powai, Mumbai (IIT Bombay)

Appeared for the PhD Enterance Exam Gate 2013 (Graduate Aptitude Test for Engineering) and secured All India Rank 38th, among 16500 candidates with a percentile of 99.76.

**Currently pursuing Doctoral studies (PhD) at Indian Institute of Technology, Powai, Mumbai in NANOMEDICINE LAB in the field of APPLIED THERANOSTICS FOR CANCER TREATMENT.**

*HIS ACADEMIC ACHIEVEMENTS:*

- Secured **10th** rank all over India in **IIT-JAM 2011** from among 5000 cndidtes.
- Cleared the written entrence for **TIFR DBS** in **2011** and selected for interview.
- Cleared the written entrance for **IISC** in **2011** and selected for interview.
- Secured **51st** rank all over India in **JNU BT** examination
- Won several intercollegiate quizzes in Biotechnology during graduation.
- Secured **2nd** position for designing **``Self Recharging Electrical Vehicle''** in .
- Received meritorious awards from LPHS in **2004, 2005, 2006, 2007** and **2008.**
- Awarded the **Numero Uno** in **2007** at LPHS for best academic performance.

✳

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दरवर्षीप्रमाणे वार्षिक अहवालापाठोपाठ चॅरिटीजने जुलैमध्ये 'न्यूज लेटर' ही सुविहीत पुस्तिका प्रकाशित केली. अभिनंदन.

✳

## कनकाईमातेचा उत्सव

विलेपार्ले येथील राजपुरिया हॉलमध्ये ५ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबरपर्यंत कनकाईमातेचा उत्सव असेल. ६ ऑक्टोबर रोजी रासगरबा आणि नवदुर्गादर्शन यांचे आयोजन आहे. अष्टमीला हवन असेल. सर्वांना हार्दिक निमंत्रण. निमंत्रक: श्री. उमेश कीर्तिकर, श्री. तुषार कीर्तिकर

लेखांक-९

## फुलता नलिनी दल

# प्रेमा तुझा रंग कसा?

— नलिनी तळपदे

प्रेम, प्रेम म्हणजे प्रेम असतं. तुमचं आमचं सेम असतं. हे झालं पाडगांवकरांचं मत. पण तसं नसतं. व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायानं प्रत्येकाच्या प्रकृतिधर्माप्रमाणे प्रेमाच्या व्याख्या व ते व्यक्त करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असू शकतात.

या प्रेमातही प्रथमदर्शनी प्रेम, सहवासातून निर्माण झालेलं प्रेम, विरहामुळे वाढलेलं प्रेम, एकतर्फी प्रेम, उथळ, उच्छृंखल प्रेम, आंधळं प्रेम, उत्कट प्रेम असे प्रेमाचे वेगवेगळे प्रकार असतात.

तसंही प्रेम कुणीही कुणावर, कशावरही करू शकतं. पण कुणी सांगितलं म्हणून किंवा ठरवूनही करता येत नाही. 'शेजाऱ्यावर प्रेम करा' असं म्हणतात आणि 'निंदकाचं घर असावं शेजारी' असंही म्हणतात. पाडगांवकरांनी 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' असं सांगूनही या ना त्या कारणानं आत्महत्या करणाऱ्यांचं प्रमाण वाढतंच आहे.

एखाद्या व्यक्तीवरची, देशावरची, धर्मावरची, कार्यावरची, ध्येयावरची निष्ठा हेही प्रेमाचंच दुसरं रूप म्हणता येईल. ते संवेदनशील, गहिरं, पारदर्शक तर असतंच; शिवाय त्यात त्याग आणि समर्पणाच्या मिसळलेल्या रंगांनी ते अधिक शोभिवंत दिसतं.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या शंभूराजांनी तर धर्मावरच्या प्रेमापायी औरंगजेबाच्या कैदेत आपल्या प्राणाचं मोल दिलं. राजपुत्राला वाचविण्यासाठी आपल्या पोटच्या मुलाचा बळी देणाऱ्या पन्नादाईच्या राजनिष्ठेलाही तोड नाही.

तशीच दीडशे वर्षांच्या ब्रिटीश राजसत्तेला झुगारून देण्यासाठी लढा देणाऱ्या, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी छातीठोक गर्जना करणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची व ज्यासाठी अंदमानात काळ्या पाण्याची जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची देशभक्तीही वंदनीय आहे. त्यांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन कित्येक कोवळ्या जीवांनी स्वातंत्र्याच्या होमकुंडात आपली आत्माहुती दिली. या सर्वांना देशाविषयी वाटणाऱ्या प्रेमाचा रंग पेटत्या मशालीसारखा तेजस्वी लालसर असावा.

स्वातंत्र्यासाठी लढणारे लोकमान्य, स्वातंत्र्यवीर काय किंवा स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते आगरकर, महर्षी कर्वे, महात्मा फुले काय; त्यांचीही आपल्या कार्यावरची निष्ठा तेवढीच जाज्वल्य होती. लोकनिंदेची पर्वा न करता त्यांनी स्त्रीशिक्षणाचा, त्यांच्या सुधारणेचा वसा घेतला. न्यायमूर्ती रानडे, महात्मा फुले यांनी तर आपल्या सहचारिणींना या कामासाठी प्रवृत्त करून त्यांच्याकरवी हे कार्य पुढे चालू ठेवले. उतू नये मातू नये, घेतला वसा टाकू नये म्हणून सावित्रीबाई, रमाबाईसारख्या भगिनी लोकापवादाला न जुमानता आपलं कार्य करत राहिल्या. ह्या सर्वांचे आपल्या कार्यावरचं प्रेम, ध्येयावरची निष्ठा, ती कळकळ, तो ध्यास, नि:स्वार्थी सेवाभाव पाहून या प्रेमात शुभ्र पांढऱ्या रंगाचा साधेपणा जाणवतो.

असंच कुणी व्यवसायावर प्रेम करून त्यात स्वत:ला झोकून देतो. तर कुणी वेगवगळ्या छंदात मन रमवतो. कुणी मस्त कलंदर मनाच्या धुंदीत जगतात. तर कुणी सेवेचं व्रत घेऊन आपल्या आयुष्याचं दान दुसऱ्याच्या झोळीत टाकतात. या दीन-दुबळ्यांच्या,अनाथ अपंगांच्या, समाजानं वाळीत टाकलेल्या रुग्णांच्या कसलाही किंतू मनात न आणता निर्मळ मनानं केलेल्या सेवेचा, त्याच्याविषयी वाटणाऱ्या प्रेमाचा रंग कुठल्याही रंगाशी बरोबरी करू न शकणारा असा चंदनाचा आहे. इतकंच नव्हे तर; त्याला गंधही चंदनाचाच आहे.

प्रेम हट्टी, एककल्ली असतं तसं समजस विचारीही असतं. खरं तर प्रेमाला कसलाच रंग नसतो. प्रत्येकाच्या स्वभावधर्माप्रमाणे त्यात रंग भरले जातात किंवा रंगाचा बेरंगही होतो. प्रेमाचा खराखुरा रंग आणि अर्थ समजून घ्यायचा असेल तर कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचं प्रेमगीत' ही कविता वाचावी. पुन्हा पुन्हा वाचावी.

सूर्याच्या तेजस्वी, मर्दानी रूपावर भाळून त्याच्यावर आत्यंतिक प्रेम करणारी पृथ्वी, त्याच्याकडून प्रतिसाद मिळत नसताना असोशीनं त्याची वाट पाहणारी, कधी ना कधी आपलं प्रेम सफळ होईल ही वेडी आशा मनात बाळगणारी पृथ्वी आणि शेवटी आपलं प्रेम एकतर्फी आहे, याची जाणीव होऊन आपल्या दुखावलेल्या मनाला सावरणारी. सूर्याबद्दल मनात किंचितही कटुता न बाळगता ती म्हणते-

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्  
मला ज्ञात मी एक धूलिकण  
अलंकारण्याला परी पाय तुझे  
धुळीचेच आहे मला भूषण.

खरंच किती समंजस, संयत, विचारी आहे हे प्रेम. आपल्याला हव्या असलेल्या भास्कराचा जीव बालकवींच्या 'फुलराणी'त गुंतलेला पाहून तिनं हलकेच त्याच्यात गुंतलेले आपले पाश सोडवून त्याला फुलराणीच्या स्वाधीन केलं. तसं सूर्यावर मोहीत झालेलं फुलराणीचं लाजरं, बुजरं, साजरं रूप तिनंही पाहिलं होतं. त्या दोघांच्या बहरणाऱ्या प्रेमात आपल्या प्रेमाचा अबोली रंग न मिसळण्याचं शहाणपण तिच्याकडे नक्कीच होतं.

खरंच प्रेम हे असं अलवार, संवेदनशील, तरल, पारदर्शक असावं. तसंच ते पतंग ज्योतीसारखं समर्पणाची भावना असणारं, आकाशातील क्षणार्धात चमकून जाणाऱ्या विद्युल्लतेवर भाळून, 'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणाचा' असं म्हणून साक्षात् मृत्यूला आपल्या कवेत घेणाऱ्या वृक्षासारखं, स्तिमित करणारं, डोळे दिपवून टाकणारं असावं. या खुळ्या, जीवघेण्या प्रेमाला इंद्रधनूचे सहारंगही अपुरे पडतील.

अशा या विविधरंगी रंगसोहळ्यात आपल्या अलीकडच्या नादान प्रेमवीरांनी असफल प्रेमानी होणारी जीवाची काहिली शमविण्यासाठी त्यांना झिडकारणाऱ्या मुलींच्या रक्ताचं शिंपण करण्याचा अघोरी उपाय आरंभला आहे.

सुरामारी, तोंडावर ॲसिड फेकणं, अंगावर रॉकेल, पेट्रोल टाकून जाळणं, या अघोरी प्रकारांनी आपल्या असफल प्रेमाचा बदला घेत सूडानं आंधळे झालेले हे प्रेमवीर विनाशाकडे निघाले आहेत. प्रेम एकतर्फी असलं तरी; मला नाही तर दुसऱ्या कुणाला नाही; इतकंही एककल्ली असू नये.

आपण दिलं म्हणून दुसऱ्यानंही आपल्याला भरभरून द्यावं असा आग्रह तरी का धरावा?

आपल्या मनाची संकुचित कवाडं उघडून या प्रेमवीरांनी भवतालचं जग पाहिलं तर आपल्या प्रेमाची क्षुद्रता त्यांच्या लक्षात येईल. इतकी निस्वार्थी, अपार माया निसर्ग आपल्यावर करतो.त्या बदल्यात आपण त्याला काय देतो?

आपण तर पर्यावरणाचा साधा समतोल सांभाळू शकत नाही. उलट सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात त्याचं खच्चीकरण करून त्याचा जीव घुसमटून टाकतो. तरीही क्षमाशील अंत:करणानं, वेगवेगळ्या रूपानं तो आपल्याला दृष्टीसुख, जगण्यातला आनंद,चैतन्य देत राहतो.

प्रेमाचा रंग गुलाबी असतो ही कविकल्पना. खरं तर प्रेमाला कसलाच रंग नसतो. ज्याच्यात्याच्या स्वभावविशेषावर वेगवेगळे रंग मिसळले जातात आणि मग संभ्रमित होऊन आपण प्रेमालाच विचारतो- 'प्रेमा तुझा रंग कसा?'

### प्रेमाचा (असाही) रंग

बसमध्ये दोन मित्र सीटवर बसले होते. आपल्या प्रेयसीविषयी पहिला मित्र भरभरून बोलू लागला. 'मी तिच्यावर यंव प्रेम करतो, त्यंव करेन तिच्यासाठी' वगैरे वगैरे. तितक्यात पुढच्या स्टॉपवर एक देखणी मुलगी चढली. हा मित्र लगेच म्हणाला, 'अरे, मी इतकावेळ जिच्याविषयी सांगत होतो ना; ती हीच.' दुसरा मित्र चकीत होऊन म्हणाला, 'अरे, तिला बोलाव ना इकडे. मी माझी सीट देतो भावी वहिनीला.' त्यावर पहिला म्हणाला, 'थांब रे जरा. तिचं तिकीट काढून होऊ दे.'!!

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

## आमच्या घरातील गणपती:- सहा पिढ्यांची परंपरा

**-विश्वास अजिंक्य**

आमच्या घरी १८४५ सालापासून गणपती येतो. आमच्या घरातील गणपतीचे यंदाचे १६९वे वर्ष. माझ्या पणजोबांचा जन्म १८४५ साली झाला. त्यावर्षी त्यांचे आजोबा लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांनी घरी गणपती आणण्याची परंपरा सुरू केली. आजच्या मुंबईकरांना लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य हे नाव कदाचित् अपरिचित असेल. अगदी या गृहस्थाचा मुंबईच्या जडण-घडणीत महत्त्वाचा वाटा असला तरी या नावाने त्यांची ओळख पटणे कठीणच. पण या शहरातील प्रत्येकाला 'भाऊचा धक्का' तर माहीत असेलच! याच लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य यांनी 'भाऊचा धक्का' बांधला. ब्रिटीशकालीन मुंबई शहराच्या आधुनिकीकरणाच्या वाटचालीत 'भाऊचा धक्का' हा माइलस्टोन आहे. देशपरदेशातून मालवाहतूक करणाऱ्या बोटींसाठी आणि कोकणातील प्रवाशांसाठी समुद्र हटवून बंदर बांधण्याची किमया लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य ऊर्फ 'भाऊ रसूल' यांनी केली. मी त्यांचा सहाव्या पिढीतील वंशज.

१८४५ ते १८९५ गिरगावात, १८९६ ते १९३५ परळ येथे, तर १९३६ पासून आतापर्यंत प्रताप मॅन्शन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर टी.टी. येथील घरात आमच्या सहा पिढ्यांनी गणपती आणण्याची परंपरा जपली आहे. गणपतीच्या आराशीसाठी आम्ही वापरत असलेले चौरंग, समया, पूजेची भांडी हे सर्व सामान आमच्याकडे वंशपरंपरागत चालत आलेले आहे. सर्व आरास सुमारे १५० वर्षांपूर्वीची आहे व आम्ही ती सांभाळून ठेवली आहे. पूजेतील पंचामृताची भांडी औरंगजेबचे मुलगे आझमशहा व कामबक्ष यांच्या काळातील चलनी नाण्यांना चांदीचे जोडकाम देऊन बनवण्यात आली आहेत; तर त्या काळातले रॉकेलवर चालणारे दिवे हे अजूनही उत्तम स्थितीत आहेत. गणपतीच्या मागचा आरसाही १०० वर्षांपूर्वीचा आहे.

गणेश चतुर्थीच्या १५-२० दिवस आधीच आम्ही घरातील सर्वजण तन-मन-धनाने कामाला लागतो. घराची साफ-सफाई, आवरा-आवरी, तसेच आराशीसाठी वापरत असलेले चौरंग, समया, पूजेची भांडी हे सर्व घासून-पुसून चकचकीत करतो.

आमचा गणपती गौरीबरोबर जातो. त्यामुळे कधी ५ दिवस, कधी ६ दिवस; तर एखाद्या वर्षी ७ दिवस. हे ५-७ दिवस गणरायाचं घरी असलेलं वास्तव्य म्हणजे साऱ्यांसाठी एक सुखाचा महासोहळा असतो. आमच्याकडे दरवर्षी एकाच प्रकारची मूर्ती आणली जाते. सर्वप्रथम घराच्या दरवाज्यात आरती करून गणेशाचे स्वागत केले जाते. गणपतीचं आगमन झाल्याबरोबर घरातील वातावरण बदलून जाते. त्याची प्रतिष्ठापना होते. गणपतीची प्राणप्रतिष्ठा व पूजा करण्यासाठी आम्ही गुरुजींना बोलवत नाही. स्वत:च करतो.

हे ५-७ दिवस आम्हाला खूप काही देणारे ठरतात. गणेशदर्शनासाठी आलेल्यांची तशीच भावना होत असावी. आता हे देणं म्हणजे काय याचे नेमके उत्तर नाही. पण व्यक्तिमत्वात खूप काही संचारतं. आयुष्यातील सर्वच प्रकारच्या अनुभवांना सामोरे जाण्याची वृत्ती तयार होते. हे ५-७ दिवस घरात कुणी ना कुणी येतच असते. त्यामुळे घर अगदी भरलेले असते. सारे घर गणपतीमय होऊन जाते. ५-७ दिवस पूर्णपणे सुट्टी असते.

गिरगावात आणि परळला राहत असताना अथर्वशीर्ष, सहस्त्रावर्तन इत्यादी धार्मिक विधी होत. गणेश याग देखील होई. माझ्या पणजोबांचा बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांच्याशी स्नेह होता. तर पणजोबांची एक बहीण इंदोरच्या तुकोजीराव होळकरांना दिली होती. या नातेसंबंधामुळे तुकोजीराव होळकरांचे; मैत्रीमुळे सयाजीराव गायकवाडांचे आमच्याकडे येणे-जाणे होते. पुढे दादरला राहायला आल्यावर आमच्या इमारतीतील रहिवाश्यांच्या उत्साही सहभागामुळे दररोज साग्रसंगीत आरत्या होऊन गणेशोत्सव दणक्यात साजरा होऊ लागला. गौरीविसर्जनाच्या दिवशी आमच्या घरातील गणपतीच्या विसर्जनाची तयारी सुरू होते. त्यादिवशी बताशाचा प्रसाद असतो. गणेशोत्सवानंतर पूजेची भांडी, समया, चौरंग या सर्व वस्तू व्यवस्थितपणे कापडात गुंडाळून मोठ्या पेटाऱ्यात ठेवल्या जातात. आमच्या घरच्या संग्रहात १०० वर्षांपेक्षा अधिक जुनी कपाटे, मछ्छरदाणीची व्यवस्था असणारे जुन्या बांधणीचे पलंग, शिसवी लाकडाचे जुने पेटारे, पोर्सिलीनची खेळणी अशा अनेक पुरातन वस्तू आहेत. त्याशिवाय शिवकालीन, होळकर बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, ब्रिटीशकालीन अशी एक हजार नाणी आमच्या संग्रहात आहेत. आमच्याकडे तीन पिढ्यांपासून काम करणारा नोकरवर्गही वस्तूंची योग्य ती देखभाल करतो.

१८४५ मध्ये ज्यांनी आमच्या घरी गणपती आणण्याची परंपरा सुरू केली ते लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य, त्यांचा मुलगा रामचंद्र व नातू विनायक (माझे पणजोबा) अशा तीन पिढ्या अक्कलकोटच्या स्वामी समर्थांना प्रत्यक्ष भेटल्या असून स्वामींनी १८७० मध्ये स्वहस्ते प्रसाद म्हणून दिलेल्या चर्मपादुका आमच्या घरात आहेत. आम्ही वंशपरंपरागत चालत आलेल्या प्रथा-परंपरा स्वीकारल्या आणि सांभाळल्याही. आमच्या अजिंक्य कुटुंबातील गणपतीची प्रथा कालांतराने पुढची पिढी चालवेल. त्यानुसार त्यात काही नवीन गोष्टींचा समावेश होत राहील. आज इतकी वर्षं गणराय आमच्या घरात येतात हे आमचे, आमच्या वास्तूचे भाग्यच आहे.

*

### पत्र प्रतिक्रिया

**उज्ज्वला आगासकर**
सुमन नगर, चेंबूर,
१ सप्टेंबर, २०१३

मा. सुहासिनी कीर्तिकर,
संपादिका, प्रभुतरुण यांस,

१३ ऑगस्ट या जन्मदिनाचे औचित्य साधून आचार्य अत्र्यांना आपण जी शब्दांजली अर्पण केली आहे ती अत्यंत लक्षणीय आहे. त्याबद्दल आपले शब्दकौतुक करण्यासाठी हा पत्रप्रपंच करीत आहे. अत्र्यांनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे त्यांच्या व्यक्तित्वात जरी 'बारा अत्रे' असले तरी तो त्यांचा विनय असू शकतो. त्यांच्या व्यक्तित्वाचे अक्षरश: हजारो पैलू पाहाता पाहाता आणि वाचतावाचता आपल्यासारख्यांची दमछाक होऊन जाते! एकदा वाचले होते की खंडाळ्याच्या त्यांच्या अतिशय प्रिय अशा बंगल्यात जाणाऱ्या त्यांच्याशी संबंधित व्यक्तींना, त्यांचा नश्वर देह नष्ट झाल्यानंतरदेखील त्यांचे अस्तित्व स्पष्ट जाणवत असे! मला तरी यात नवल वाटत नाही कारण अत्र्यांच्या सर्वव्यापी व्यक्तिमत्वाला हा पैलूदेखील असणे कठीण नाही. एकपात्री अभिनयातील एक प्रख्यात व्यक्ती मा. सदानंद जोशी हे तर अत्र्यांचा पेहराव आणि हालचाली यांचे अनुकरण करताकरता इतके 'अत्रेमय' होऊन गेले की अत्र्यांचा म्हणून जोशींचाच फोटो जरी लेखासोबत छापला तरी वाचकांच्या ते लक्षात येत नसे. अत्र्यांसारख्या बलदंड व्यक्तिमत्वाने आपल्या वक्तृत्वानिशी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रयोजनात उडी घेऊन झोकून दिले नसते आणि बाळासाहेब ठाकऱ्यांसारख्या किरकोळ शरीरयष्टीच्या व्यक्तीने मुंबईपासून सुरुवात करून मराठी माणसाचा अभिमान धगधगत ठेवला नसता, 'मला काय त्याचे' अशा पळपुट्या मनोवृत्तीने हे दोघे सारा तमाशा दुरूनच पाहात राहिले असते, तर आज मराठी माणसाचे हाल खायला काळे कुत्रेदेखील आले नसते!

आपण अत्र्यांचे स्मरण केले त्यामुळे इतके सारे लिहावेसे वाटले, पुनश्च आपले कौतुक!!

### पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १८ ऑगस्ट, २०१३ रोजी अध्यक्षा सौ. वृंदा शाम जयकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

वरील सभेत मांडले गेलेले सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

त्याच दिवशी स्मरणशक्ती स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मराठी व हिंदी (महिलांसाठी), मुलींसाठी मराठी व हिंदी स्पर्धा घेण्यात आल्या. स्मरणशक्ती स्पर्धा:- प्रथम क्रमांक सौ. स्वप्ना विनित जयकर, द्वितीय क्रमांक श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर व तृतीय क्रमांक सौ. गौरी हिरेन नायक ह्यांना मिळाले. त्याचे परीक्षण उपाध्यक्ष सौ. स्वाती जयकर ह्यांनी केले.

वक्तृत्व स्पर्धा:- मराठी व हिंदीमध्ये सौ. स्वप्ना विनित जयकर ह्या एकच स्पर्धक असल्यामुळे त्यांना समाजाचे बक्षीस दिले.

### भावांजली

गेल्या महिन्यात, श्रीमती आशा श्रीवल्लभ वेलकर, मा.नगरसेविका, मुंबई महानगरपालिका यांना देवाज्ञा झाली. १९७२ साल ते १९८० पर्यंत त्या नगरकार्यबद्ध होत्या. सुरुवातीला जनसंघ या पार्टीतून मुंबई-सी वॉर्डातून त्या निवडून गेल्या. त्यानंतर काँग्रेस पार्टीतर्फे बोरिवली मतदारसंघातून निवडून आल्या. बोरिवलीतील व इतर भागातील आपल्या ज्ञाती बांधवांना, जमीन धारकांना त्यांची मदत होत असे.

वसंतदादा पाटील व मुंबई काँग्रेस अध्यक्ष भानुशंकर याज्ञिक यांचे त्यांना प्रोत्साहन असे. त्यांना आदरपूर्वक भावांजली.

(टीप:- 'भावांजली'चे शब्दांकन श्री. प्रताप वेलकर यांचे आहे.)

लेखांक ९

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

सकारात्मकता आणि नकारात्मकता ह्या विषयाची व्याप्तीच एवढी मोठी आहे की त्यावर जेवढं बोलू, लिहू तेवढं थोडंच. प्रत्येक व्यक्तीच्याभोवती एक अदृश्य तेजोवलय असतं. इंग्रजीत त्याला 'ऑरा' म्हणतात. हा ऑरा ज्याचा जास्त प्रभावी तेवढा तो माणूस तेज:पुंज दिसतो. ज्ञानेश्वरादी संत, गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त ह्यांच्या चित्रांमध्ये त्यांच्या डोक्याच्या मागे एक पांढरं वलय दाखविलं जातं, तोच ऑरा. तुम्ही जेवढी सकारात्मकता बाळगाल तेवढा तुमचा ऑरा- परिणामी चेहरा- चांगला असतो. पण नकारात्मकतेनं हाच ऑरा काळवंडतो, बिघडतो. कदाचित् ह्याच्यावरूनच एखाद्या वाईट प्रवृतीच्या माणसाबद्दल आपण बोलतो की त्यानं नावाला काळिमा फासला. नाव म्हणजेच तो विशिष्ट चेहरा म्हणजेच त्याचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व आणि अनुषंगानं त्याचा 'ऑरा'. हल्ली एखादा भ्रष्ट नेता किंवा भ्रष्ट सरकारी नोकर असेल त्याला काळा रंग फासण्याचा प्रघात आहे. सत्प्रवृतीची माणसं चांगलं बोलतात, चांगलं वागतात. परिणामी त्यांचा ऑरा तेजस्वी होतो किंवा राहतो. अर्थात् कधी कधी सततच्या किंवा मोठ्या आजारपणामुळेसुद्धा माणसाचा चेहरा काळवंडतो ते वेगळं. आपल्या खाण्यापिण्यावरसुद्धा आपला ऑरा अवलंबून असतो.

पूर्वीचे ध्यानधारणा करणारे ऋषीमुनी सात्विक आहार घ्यायचे. ब्राह्मणवर्गाचा आहार सात्विक समजला जातो. अर्थात् आत्ताच्या काळात चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार ही समजूत प्रत्येकाच्या बाबतीत खरी असेलच असे नाही. एखादा क्षत्रियसुद्धा सात्विक आहार घेणारा नी ब्राह्मण राजस अथवा तामस आहार घेत असतो. तामस आहार घेणाऱ्या जातीवंत ब्राह्मणाचा ऑरा वाईट असू शकतो. मात्र राजस आहार घेणाऱ्या क्षत्रियांचा ऑरा वेगळाच रूबाबदार असतो. सात्विक आहार घेऊन जर दुष्कर्म केली तरी ऑरा चांगला राहत नाही. म्हणजेच तुमचे आचार आणि विचारसुद्धा चांगले हवेत. विचार नेहमी समृद्ध हवेत. एकांगी, नकारात्मक विचार कधीही करीत बसू नये. चांगले विचार माणसाच्या कृतीमधून नेहमीच व्यक्त होत असतात.मन रिकामं ठेवू नये. असं म्हणतात की रिकामं मन हे सैतानाचं घर असतं. देव आणि सैतान दोन्ही तेवढेच शक्तिशाली असतात. देव चिरंतन राहणाऱ्या चांगल्या गोष्टी, ऐहिक सुखं देतो. तर सैतानाचा मार्ग वाईट अंतापर्यंत पोहोचवतो. देवाकडून कदाचित् थोडं उशीरा सुख मिळेल. पण ते चिरकाल टिकणारं असतं. देवाची पूजा सकारात्मकता देते तर; सैतानाची पूजा नकारात्मकता भरते. असं असूनसुद्धा सैतानाची पूजा ताबडतोब ऐहिक फळं देते. पण ती फळं शेवटी नरकाचीच वाट दाखवतात. सकारात्मक पद्धतीनं विचार केला तर आजुबाजूला सगळं चांगलंच वातावरण प्रत्ययास येतं. आपलं मन सदैव आनंदी राहते आणि चित्त एकाग्र लवकर होतं. म्हणून जे देवाचे सच्चे भक्त असतात त्यांना एकाग्र चित्ताने मागितलेल्या गोष्टी चटकन् मिळतात. लहान मुलं निष्पाप, निरागस असतात. म्हणून देव त्यांचं चटकन् ऐकतो. म्हणजेच लहान मुलं जेव्हा देवाकडे काही मागताना त्यांचं चित्त ताबडतोब एकाग्र होतं. खरी दैवी शक्ती एखाद्या माणसात आहे असं जेव्हा आपण म्हणतो किंवा खरंच तसं जाणवतं तेव्हा त्या माणसात ही सकारात्मकता, एकाग्रचित्त सर्व काही बऱ्याच प्रमाणात एकटवलेलं असतं.

कोणत्याही चांगल्या गोष्टीच्या प्रारंभाला 'श्रीगणेशा' म्हणतात. जिव्हेवर चांगली भाषा, विचारांमध्ये पावित्र्य असं जिथं असतं तिथं, त्या मनात देवाचा खूप मोठा अंश वास करीत असतो. हा देवाचा अंश प्रत्येकात असतो. त्याची व्याप्ती मणभर करून मनभर तो अंश पसरवायचा की नाही हे प्रत्येकावर अवलंबून असतं. जिथं घरात सदैव शिवराळ, असभ्य भाषा, असभ्य वर्तन असतं तिथं पैसा कदाचित् येतही असेल; पण टिकत नाही आणि जीवनच क्षतिग्रस्त होऊन जातं. अर्थात् सत्प्रवृत्त माणसांचा पैसाही आजारपण किंवा दुसऱ्या काही कारणांनी संपतो तेव्हा ते त्यांचं प्रारब्ध असतं. वाईट माणसांकडे पैशाबरोबरच मानसन्मान, प्रतिष्ठा येतात. त्या कोणत्याही मार्गानं मिळवलेल्या असतात. पण तिथं मन:शांती कधीच नसते. पैशाबरोबरची मन:शांतीही फक्त आणि फक्त चांगल्या मार्गानं मिळवलेल्या पैशानीच मिळते. त्या व्यक्तीचा ऑरा आणि मन:शांती नसलेल्यांचा ऑरा ह्यात खूप फरक असतो. सकारात्मकतेनं जो स्वभाव तयार होतो तो सगळी आव्हाने पेलू शकतो. नकारात्मकतेनं माणसं घुमी होतात. अबोल किंवा मितभाषी म्हणजे घुमी नव्हेत. खूप उच्चशिक्षित, कर्तृत्ववान आणि अत्यंत कुशाग्र बुद्धीमत्तेची माणसं वाचाळ नसतात. जबाबदारीनं बोलणारी असतात. म्हणून कमी बोलतात. सकारात्मकतेला भीती असते ती फक्त देवाची. पण नकारात्मकतेला जगण्याचीच भीती निर्माण होऊ लागते किंवा अशी माणसं जीवावर उदार होऊन कोणतंही काम अतिशय बिनधास्तपणे करतात. असं होणं ही विरोधाभासात्मक प्रतिक्रिया त्यांच्या मनात काम करते.

चांगल्या सकारात्मकतेसाठी चांगलं वाचन अत्यावश्यक असतं. हा सप्टेंबर महिना सरस्वतीचा महिना. नवरात्रीचं एक नवीन व्रत म्हणून लिहिण्याचं व्रत सुरू करायला काय हरकत आहे? पुष्कळ शाळा सप्टेंबरपासून शिशुवर्गाला प्रवेश देतात. तिथंही लिहिण्यावाचण्याचा श्रीगणेशाच असतो. लिहिण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी चांगल्या अभिव्यक्तीसाठी शब्दभांडार हवंच. पण स्वत:ला नीट व्यक्त व्हावयाचं असेल तर त्यासाठी खूप वेगवेगळ्या तऱ्हेनं विचार करण्याची सवय हवी. लेखनकला ही उपजतच असते. बाकी सर्व कला क्लासमध्ये शिकवता येतात. लेखनाचे क्लासेस नसतात आणि नुसतं 'असं लेखन करावं' असं सांगून कुणी लेखक होऊ शकत नाही. कविवर्गाचंही तसंच. वर्डस्वर्थनं काव्याची व्याख्या केलीय त्याचं मराठी रूपांतर असं की 'आपल्या भावनांचा सहज उद्रेक म्हणजे काव्य'. लेखक किंवा कवींना विचार आणि शब्द शोधावे लागत नाहीत. एखाद्या प्रपातासारखे ते सतत मनात कोसळत राहतात आणि लेखणीमधून कागदावर झरझर उतरत राहतात. जर कुणामध्ये हा दैवी अंश असेल तर तो लेखक किंवा कवी म्हणून अचानक व्यक्त होऊ लागतो. पण त्यासाठी प्रत्येकानं आपल्याला लिहिता येतंय की नाही ह्याचा शोध घेणं अत्यावश्यक आहे.

लहानपणी शाळा कॉलेजमध्ये प्रत्येकानं निबंध लिहिलेले असतात. ते ज्यांना छान जमायचे त्यांना थोडंफार तरी लेखन म्हणजे एखादा स्फुट लेख लिहिणं जमेल. लिहिता लिहिता शब्दभांडार वापरणं जमू लागेल. लेखनाला चकाकी येईल. प्रत्येक लेखक आणि कवी ह्यांची स्वतंत्र शैली असते. माझ्या आईच्या कवितांची शैली व माझ्या कवितांची शैली ह्यात खूप फरक आहे. कोणत्याही दुसऱ्या लेखकाचं किंवा कवीचं नुसतं अनुकरण करून लिहिता येत नाही. वाङ्मयचौर्य तर अतिशय वाईट. ते लोक कायद्याच्या कचाट्यात सापडू शकतात. तसंच लेखनातून दुसऱ्यावर ठळकपणे लक्षात येईल असा चिखल उडवणारेसुद्धा कायद्याच्या कक्षेत येऊ शकतात. दुर्दैवानं हे माहीत नसलेले लोक सवंग प्रसिद्धीसाठी ह्या मार्गाचा अवलंब करतात. अशावेळी लिहिणारा आणि छापणारा असे दोघेही अडचणीत येतात.

लेखन हे दुसऱ्यावर सूड उगविण्यासाठी किंवा 'त्यात काय मोठंसं? आम्हीसुद्धा लिहू शकतो' हे दाखविण्यासाठी करू नये. लेखनात सकस विचार हवेत. सकारात्मकतेनं मनात भरलेली ऊर्जा लेखनातून साकार होणं गरजेचं असतं. वाङ्मयात विविध प्रकार आहेत. माझ्या आईकडून मला लेखनाचा वारसा मिळाला. तरीही बालसाहित्य किंवा नाटक हे वाङ्मयप्रकार माझ्या हातून निर्माण झाले नाहीत. माझं लेखन कविता, लघुकथा, कादंबऱ्या आणि ललित लेख ह्या प्रांगणामध्ये मुक्तपणे बागडत राहतं. माझी आई नाट्यछटा, नाटकं, कवितांचे दोन्ही प्रकार- बालगीतं आणि मोठ्यांसाठीच्या कविता ह्या क्षेत्रात सहज लेखन करायची. माझ्या मॉंटेसरीच्या वर्गासाठी मी त्यात असतांना व नंतरही माझ्यासह त्या वर्गाच्या पहिल्या बॅंचला घेऊन व त्या त्या वर्षाच्या नवीन मुलांना घेऊन तिनं आकाशवाणीच्या गंमतजंमतमध्ये तीन-चार कार्यक्रम सादर केले. ती त्या शाळेसाठी संपूर्ण कार्यक्रमच लिहायची व पहिल्या बॅंचचे आम्ही काही विद्यार्थी त्यात भाग घेत असू. आम्ही इयत्ता चौथीपर्यंत ह्या कार्यक्रमात भाग घेत होतो. पण मी हे सर्व करू शकणार नाही. लेखकाला स्वत:च्या मर्यादांचीही पूर्ण जाणीव हवी. माझ्या आईप्रमाणेच मी कविता तर लिहितेच, पण प्रसंगोपात्त गाणीसुद्धा खूप रचली. स्टेट बॅंकेच्या वरळी येथील इ.डी.पी. सेंटरमध्ये मी असताना एखाद्या उच्चपदस्थाला निरोप नी नव्याचं स्वागत, वार्षिक कार्यक्रमाचं स्वागतगीत, मंगलाष्टकं (आईचा वारसा), विवाहाची निमंत्रण पत्रिका इत्यादी खूप गाणी रचली आहेत, जी सर्वांनी प्रशंसिली आहेत.एका विवाहाला एका पक्षाचे एक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. त्या विवाहाची निमंत्रणपत्रिका मी काव्यात गुंफली होती. त्यांनी माझी व्यक्तिश: प्रशंसा केली. अशा प्रसंगामधून मला अधिकाधिक नी चांगलं लिहिण्याची प्रेरणा लाभली. पूर्वीच्या सर्व मासिकांमधून महिन्याला सहा ह्या हिशेबानं माझ्या कविता, लघुकथा सतत छापून येत आणि मला जबरदस्त फॅनमेल येत असे. त्यामुळे स्फूर्ती येऊन लेखन करावंसं वाटलं.

नेमकं कशावर लिहावसं वाटेल ते लेखक आणि कवीच जाणतात. 'तुम्हाला काय सुचतं' ह्याचं उत्तर भलेभले थोर साहित्यिकसुद्धा देऊ शकलेले नाहीत. कवितेच्या ओळीच्या ओळी तयार होऊनच मनात उतरतात. प्रत्येक लेखकाची शैली पूर्णपणे स्वतंत्र असते.

हे सगळं खरं असलं तरीही मूळ मुद्दा कायम राहतो तो म्हणजे प्रत्येकानं लिहिण्याचा प्रयत्न जरूर करावयास हवा. तेव्हा लिहा आणि लिहिण्यासाठी खूप वाचा.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणग्या

**‘प्रभुतरुणा’च्या वर्धापनदिनानिमित्त:-**

❁ सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकर यांजकडून रु. ५०००/-

❁ श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून ईश्वरी विद्याधर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रु. २०००/-

❁ सौ. नीलन आणि श्री. दीपक धैर्यवान यांजकडून रु. १००१/-

❁ कुमार ईशान दीपक कोठारे आणि कुमारी निष्का दीपक कोठारे यांजकडून रु. ५०१/-

❁ सौ. अनुराधा आणि डॉ. विनोद धुरंधर यांजकडून रु. ५००/-

❁ सौ. पूजा आणि श्री अमर अनिल अजिंक्य यांजकडून रु. ५००/-

❁ सौ. बागेश्री योगेन परीख यांजकडून रु. ५००/-

❁ सौ. सुरेखा आणि श्री. प्रदीप शामराव कोठारे यांजकडून रु. ५००/-

❁ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान यांजकडून रु. २५१/-

❁ श्री. मिहीर विनोद धुरंधर यांजकडून रु. २५१/-

❁ सौ. सुहास आणि श्री. नंदकुमार विजयकर यांजकडून रु. २००/-

❁ सौ. उर्मिला आणि श्री. उदय बा. जयकर यांजकडून रु. १००/-

❁ सौ. अदिती आणि डॉ. अनिकेत एन्. तळपदे यांजकडून रु. ५०/-

## प्रभुतरुणास देणग्या

❁ सून सौ. स्विनी व पुत्र मिहीर यास पुत्र आणि कन्यारत्न प्राप्त झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ सौ. रोहिणी आणि श्री. अजित इंद्रसेन नवलकर यांजकडून रु. ५०० /-

❁ श्री. सतेज रमेश तळपदे यांजकडून कन्या झाल्याप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❁ सौ व श्री. प्रफुल्ल एस् राणे आणि सौ. व श्री. सुबोध आर नवलकर यांजकडून नातू नील याच्या क्रीडा क्षेत्रातील यशाप्रीत्यर्थ रु. २५१/-

❁ श्री. प्रकाश वसंत जयकर यांजकडून प्रभुतरुणाचे आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

❁ श्री. देवेंद्र समीर व्यवहारकर आणि कु. क्रित्वी समीर व्यवहारकर यांजकडून त्यांचे आजोबा कै. चित्रसेन वामनराव व्यवहारकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❁ सौ. रश्मी आणि श्री. प्रमोद जयकर यांजकडून सुपुत्र श्री. विपुल याचा नारळसाखर झाल्याप्रीत्यर्थ रु. २५१/-

## दिलासा

दिनांक १७ ऑगस्ट २०१३ रोजी लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले येथे एक ‘लोकमान्य’ व्हावा असा कार्यक्रम पार पडला. सी. म. जोशी दिलासा केंद्रातर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी संवाद, सल्ला व सहयोग देण्याच्या उपक्रमांतर्गत मदत केंद्राचे उद्घाटन माननीय श्री. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते पार पडले. ज्येष्ठ नागरिकांसाठी असणाऱ्या हेल्पलाईन सेवेसाठी सौ. बागेश्री योगेन परीख यांचा पुढाकार होता. त्यांनी फार छान प्रास्ताविक केले. मनमोकळा संवाद, समुपदेशन, वैद्यकीय सल्ला, कायदाविषयक मार्गदर्शन, आर्थिक मार्गदर्शन आणि नेत्र-देह-त्वचा आदींच्या दानाविषयी मार्गदर्शनपर जागरुकता असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. इच्छुकांना ०२२-२६१४२१२५ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. बागेश्रीताईंच्या या उपक्रमाला ‘प्रभुतरुणा’च्या शुभेच्छा.

# प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१९-६-१३ सौ. स्विनी आणि श्री. मिहीर अजित नवलकर - पुत्र आणि कन्या, पॅरिस

### आत्याबाई नाव बोला

१९-६-१३ कु. अलायना मिहीर अजित नवलकर
१९-६-१३ चि. समर मिहीर अजित नवलकर
०५-८-१३ कु. कायरा राजेश रमेश तळपदे, लंडन

### नारळ साखर दिला

२८-८-१३ श्री. विपुल प्रमोद जयकर, कु. श्रुतिका राजन भुर्के (आं. ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-७-१३ | श्रीमती सुलभा दत्तकुमार देसाई | वय ८४ | ठाणे |
| ०८-८-१३ | श्रीमती सुरेखा तुळशीदास तळपदे | वय ९३ | गोरेगाव |
| १७-८-१३ | श्रीमती मधुबाला इंद्रसेन नवलकर | वय ८९ | खार |
| ३०-८-१३ | श्री. गजेंद्र चंद्रसेन गोरक्षकर | वय ८२ | दहिसर |
| ३०-८-१३ | श्रीमती रेखा यदुनाथ वैद्य | वय ७५ | गिरगाव (भाई जीवनजी लेन) |

## पाठारे प्रभु सोशल समाज

सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि नवीन समिती, तसेच एका विश्वस्तपदाची निवडणूक दिनांक २५ ऑगस्ट, २०१३ रोजी खार येथील ज्ञातिसभागृहात पार पडली. सभेत आधीच्या सभेची टिपणे मंजूर झाली. अहवालास व वार्षिक जमाखर्चाच्या ताळेबंदास सभेने मान्यता दिली. निवडणुकीची कार्यवाही करताना श्री. रंजन विजयकर, श्री. सुनील जयकर, श्री. उदय मानकर आणि श्री. सतेज तळपदे यांनी निवडणूक अधिकाऱ्याचे काम पाहिले. निवडून आलेल्या सभासदांची नावे पुढीलप्रमाणे:-

श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे (विश्वस्त), श्रीमती स्वाती प्रवीण राणे (अध्यक्ष), सौ. स्वाती तारकनाथ जयकर (उपाध्यक्ष), सौ. नीता मिलिंद सेंजित आणि श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर (सं. चिटणीस), श्रीमती रेणुका धुरंधर (कोषाध्यक्ष), श्री. राहुल किरण आगासकर, श्री. चारुदत्त नवीनचंद्र धैर्यवान, श्री. निकोलॉव्ह प्रकाश कीर्तिकर, सौ. नूतन जयंत कीर्तिकर, श्री. प्रसाद मुकुंद कीर्तिकर, श्री. तुषार अनंत कीर्तिकर, सौ. पल्लवी परेश कोठारे, श्री. उल्हास मोरेश्वर राणे, सौ. उन्नती उल्हास राणे, सौ. बिंबा मनोज नायक, श्री. अभिजित सुरेश विजयकर, सौ. प्रतिभा सुरेंद्र विजयकर, श्री. शैलेंद्र मधुकर तळपदे. सर्वांचे अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

**डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, चवथे सत्र**
श्री. मिहीर प्रदीप श्रीपाद नवलकर
६८९/८७५, ७८.७४ %

**डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, दुसरे सत्र**
श्री. विद्युत प्रदीप श्रीपाद नवलकर
६९४/८००, ८६.७५ %

**बीएस्‌सी (बायोटेक)**
कु. अंबुजा प्रदीप श्रीपाद नवलकर
६३३/८००, ७९.१३ %

**बी. कॉम**
कु. गुणश्री आनंद धराधर
६००/७००, ८५.७१ %

**एचएससी (विज्ञान)**
श्री. अर्णव विक्रांत विजयकर
५०७/६००, ८४.५० %

**बी.ई. (कॉम्प्युटर)**, पुणे विद्यापीठ
श्री. आकाश मनिष नायक
९४९/१५००, प्रथम वर्ग

**एम् कॉम्**
कौमुदी सुश्रुत राणे
५३४/८००, प्रथम वर्ग

**एमडी (होमियोपाथी)**
डॉ.तन्मय प्रदीप विजयकर

**चुकीची दुरुस्ती**


गतांकी ‘परीक्षेतील सुयश’मधील एमएस्‌सी, फार्मासिटीकल सिस्टीम मॅनेजमेंट, न्यूजर्सी या परीक्षेत किरण व्ही वेलकर ऐवजी श्री. करण विक्रम वेलकर असे वाचावे.

## अभिनंदन

❁ श्री. महेश कोठारे यांची ऑस्करच्या नामांकन निवड समितीवर माननीय ‘ज्यूरी’ म्हणून निवड झाली.

❁ डॉ. सुमन नवलकरांचे ‘गडबड घोटाळा’ हे बालकवितांचे पुस्तक प्रसिद्ध झाले.

## अभिनंदन



चि. नील सतेज राणे याची दाना कप फूटबॉल टूर्नामेंटमध्ये निवड झाली. २२ जुलै ते २८ जुलै दरम्यान डेन्मार्क येथे झालेल्या या टूर्नामेंटमध्ये नील याने आपल्या शाळेबरोबरच भारताचेही प्रतिनिधीत्व केले. अभिनंदन. यशाला सतत ‘कीक’ बसत राहो नील!

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67